# जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभा दि. १३.०५.२०२२ चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात कार्यबल समितीची सभा महाव्यस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि.१३.०५.२०२२ रोजी महाव्यवस्थापक यांचे दालनात संपन्न झाली. सभेच्या सुरवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरवात केली.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती मध्ये जिल्हयाच्या निर्यात आराखडयाचा ड्राफ्ट ॲक्शन प्लॅन तयार करुन मा.अध्यक्षांच्या मान्यतेने उद्योग संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आल्याचे मा.महाव्यवस्थापक यांनी सांगितले. निर्यातीस चालना देण्यासाठी तसेच प्रस्तावित आराखडयात अजुन काही सुचना असतील तर त्या मांडाव्यात असे आवाहन मा.महाव्यवस्थापक यांनी सादर बैठकीत केले.

श्री.सुनिल रायठ्ठा यांनी प्रस्तावित आराखडयात सादर केल्यानुसार निर्यातीबाबत उद्योजकांना व भावी उद्योजकांना काही माहिती व्हावी यासाठी ईपीसी च्या माध्यमातून जागरुकता होणे गरजेचे आहे असे सूचित केले. तसेच श्री.काबरा, संचालक, भाग्यलक्ष्मी स्टील प्रा.लि.यांनी जिल्हयात ड्रायपोर्टचे काम प्रगतीपथावर असून त्यामुळे निर्यातीला मिळणाऱ्या संधीबाबत जागृती होणे गरजेचे आहे. त्यानुषंगाने ड्रायपोर्ट मुळे निर्यातीस मिळणाऱ्या संधी याबाबत एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करावी असे सूचित केले, यावर सर्व उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली.

तसेच निर्यातीला चालना देण्यासाठी टीआयईएस योजने बाबत महाव्यवस्थापक यांनी माहिती दिली. इंफ्रास्ट्रक्चर संबंधीत, पॅकेजींग, टेस्टींग व इतर आवश्यक सुविधा या योजनेतून मिळू शकतात याची माहिती दिली. श्री.बळीराजा फार्मा प्रोडयूस कं.चे श्री.पडूळ यांनी मोसंबी प्रक्रीया व पॅकेजींगसाठी या योजनेचे सहकार्य मिळ शकते का याबाबत विचारणा केली असता महाव्यवस्थापक यांनी मदत होवू शकते. त्या करीता सदर प्रकल्पाची कनसेप्ट नोट तयार करुन सादर करावी. जेणेकरुन पुढील कार्यवाहीसाठी मुख्यालयास सादर करता येईल असे सूचित केले. यास सर्वांनी सहमती दर्शविली.

तसेच येणाऱ्या डीईपीसी बैठकीत निर्यातीला प्रोत्साहन व चालना मिळावी यासाठी विविध विषयांवर कार्यशाळा, माहिती बाबत नियोजन करावे व सदर विषय बैठकीत मांडावा असे उपस्थीत सदस्यांनी सूचित केले. सभेस उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून सभा संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

महाव्यवस्थापक तथा सचिव,
जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती,जालना

## सभेस उपस्थित सदस्यांची यादी

| अ.क्र. | पदनाम | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्रीमती के.व्ही.खरात | महाव्यवस्थापक, जिउकें, जालना |
| २ | श्री.गणेश पडुळ, | संचालक, |
| ३ | श्री.सुनिल रायठ्ठा, ईपीसी मेंबर | ईपीसी मेंबर |
| ४ | श्री.नितीन काबरा | भाग्यलक्ष्मी इंडस्ट्रीज, जालना |
| ५ | श्री.अक्षय गेही | जालना इंडस्ट्रीयल असो.जालना |
| ६ | श्री.ए.एस.भांडे, उद्योग निरिक्षक | जिल्हा उद्योग केंद्र, जालना |